**RNI No. MAHBIL /2009/37831**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

**वर्ष ७, अंक १३९]** **शुक्रवार, नोव्हेंबर १२, २०२१/कार्तिक २१, शके १९४३** **[पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक ३३३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ नोव्हेंबर २०२१

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक. मुद्रांक-२०२०/३१०/प्र.क्र.१२७/एम-१(धोरण). – ज्याअर्थी, केंद्र सरकारची आरोग्य योजना (सीजीएचएस) व राज्य शासनाची आरोग्य योजना (एसजीएचएस) यांनुसार सवलतीच्या दरामध्ये वैद्यकीय उपचार करण्यासाठी व आरोग्य देखभाल (सुश्रृषा) सुविधा पुरविण्यासाठी आणि एकूण खाटांच्या संख्येपैकी किमान १२.५ टक्के खाटा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील (इ.डब्ल्यू.एस.) व्यक्तींसाठी किंवा द्रारिद्र्य रेषेखालील व्यक्तींसाठी आणि राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी आणि सर्वसाधारण जनतेसाठी राखून ठेवण्याकरिता एल.एम.नाडकर्णी मार्ग, नाडकर्णी पार्क, बीपीटी वसाहत, वडाळा (पूर्व), मुंबई येथे ६०० खाटांची एकूण क्षमता असलेले सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, म्हणजेच ग्रँड पोर्ट हॉस्पिटल (यात यापुढे ज्याचा निर्देश, " उक्त रुग्णालय" असा केला आहे) उभारण्यासाठी मुंबई पोर्ट ट्रस्ट व मेसर्स झोडियाक हिलोट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी सार्वजनिक खाजगी भागिदारी तत्त्वावर करारनामा केला आहे;

त्याअर्थी आता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ९ च्या खंड (अ) व्दारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, जनहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्याने, याव्दारे, एल.एम.नाडकर्णी मार्ग, नाडकर्णी पार्क, बीपीटी वसाहत, वडाळा(पूर्व), मुंबई येथे स्थित असलेल्या दहा एकर क्षेत्रफळाचा भूखंड (मुंबई पोर्ट ट्रस्ट च्या मालकीचा), तीस वर्षांच्या भाडेपट्ट्यावर देण्यासाठी मुंबई पोर्ट ट्रस्ट व मेसर्स झोडियाक हिलोट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामध्ये करण्यात आलेल्या भाडेपट्टा करारनाम्याच्या संलेखावर, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-एकच्या अनुच्छेद ३६ अन्वये आकारणीयोग्य असलेले रुपये ८,८४,३१,१५० इतके मुद्रांक शुल्क आणि उक्त अधिनियमाअन्वये आकारणीयोग्य असलेली त्याची रुपये ४,४२,१५,५७५ इतकी शास्ती, पुढील शर्तीच्या अधीन राहून, माफ करीत आहे :—

**शर्ती :—**

(१) रुग्णालय, या आदेशाच्या अटी व शर्तीचे पालन करीत आहे किंवा कसे यासंबंधी संनियंत्रण करण्यासाठी संचालक, आरोग्य सेवा संचालनालय वा आरोग्य सेवा संचालक यांनी प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी हे सक्षम प्राधिकारी असतील.

(२) रुग्णालय, वरील बाबींसंबंधात आवश्यक असलेली तपशीलवार नियतकालिक विवरणपत्रे, आरोग्य सेवा संचालक यांना सादर करील.

(३) रुग्णालय, गरजू व्यक्तींवर केलेल्या मोफत सवलतीतील उपचाराशी संबंधित असणारा अभिलेख ठेवील, मागणी केल्यावर, तो आरोग्य सेवा संचालकास उपलब्ध करून देण्यात येईल.

(४) रुग्णालय, शासनाकडे असे हमीपत्र दाखल करील की, या आदेशाच्या नमूद केलेल्या अटी व शर्तीचे ते पालन करील.

(५) ज्याला या आदेशान्वये मुद्रांक शुल्कात सवलत दिलेली आहे तो उक्त करारनाम्याचा पक्षकार, अन्य कोणत्याही आदेशानुसार किंवा धोरणानुसार त्याच व्यवहारासाठी मुद्रांक शुल्क माफ करण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी हक्कदार असणार नाही.

(६) जर रुग्णालयाने, उक्त करारनाम्यामध्ये किंवा आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेले वैद्यकिय उपचार करण्यास व आरोग्य देखभाल (सुश्रृषा) सुविधा पुरविण्यास कसूर केली तर, किंवा उक्त करारनाम्यामध्ये किंवा आदेशांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीपैकी कोणत्याही अटीचे किंवा शर्तीचे उल्लंघन केले तर, जणू काही सुरुवातीपासूनच मुद्रांक शुल्कामध्ये सूट दिलेली नव्हती असे समजून, ते, संपूर्ण मुद्रांक शुल्क व शास्ती, कोणत्याही असल्यास, प्रदान करण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीधर डुबे-पाटील,**
शासनाचे सह सचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT,**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 11th November 2021

**Order**

MAHARASHTRA STAMP ACT.

No.Mudrank-2020/310/C.R.127/M-1(Policy).— Whereas, the Mumbai Port Trust and M/s. Zodiac Healotronics Pvt. Ltd. have entered into concession agreement on public private partnership for setting up a Super Specialty Hospital with a total capacity of 600 beds *i.e.* Grand Port Hospital (hereinafter referred to as "the said Hospital") located at L.M. Nadkarni Marg, Nadkarni Park, BPT Colony, Wadala ( East), Mumbai to provide medical treatment and healthcare facilities at concessional rate as per the Central Government Health Scheme (CGHS) and the State Government Health Scheme (SGHS) and to reserve at least 12.5% beds out of total number of beds to the persons from Economically Weaker Sections (EWS) or to the persons below the poverty line and to the State Government employees and their families and people at large;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby remits the stamp duty of Rupees 8,84,31,150 chargeable under Article 36 of the Schedule –I appended to the said Act and penalty of Rupees 4,42,15,575 chargeable under the said Act therefore, on the instrument of lease agreement of a land parcel admeasuring ten acres situated at L.M. Nadkarni Marg, Nadkarni Park, BPT Colony, Wadala ( East), Mumbai (belonging to the Mumbai Port Trust) on a lease of thirty years, between the Mumbai Port Trust and the M/s. Zodiac Healotronics Pvt. Ltd. subject to the following conditions, namely :—

*Conditions*—

(1) The Director, Directorate of Health Services, Government of Maharashtra or any other Competent Authority, authorized by the Director of Health Services shall be the competent authority to monitor as to whether the Hospital is observing the terms and conditions of this Order.

(2) The Hospital shall furnish the detailed requisite periodical statements to the Director of Health Services in regard to above.

(3) The Hospital shall maintain record regarding free concessional treatment rendered to the needy persons, which shall be made available to the Director of the Health Services on demand.

(4) The Hospital shall file an undertaking with the Government that it shall abide by the enumerated terms and conditions of this Order.

(5) The party to the said Agreement, which has availed concession in stamp duty under this Order, shall not be entitled for remission or reduction of the stamp duty for the same transaction as per any other order or policy.

(6) If the Hospital fails to provide medical treatment and healthcare facilities specified in the said agreement or this Order, or commits breach of the any of the terms and conditions specified in the said agreement or this Order, shall be liable to pay the whole stamp duty and penalty, if any, as if there was no remission in stamp duty from the beginning.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHRIDHAR DUBE-PATIL,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.